Estd: 1962

'B' Accredited by NAAC

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यापीठ निधीमधून भरावयाच्या वर्ग ४ मधील 'माळी' पदांच्या प्रसिध्द केलेल्या जाहिरात क्र.०३/२०१९ दि.८/३/२०१९ च्या अनुषंगाने लेखी परीक्षेसाठी उपस्थित/पात्र झालेल्या उमेदवारांसाठी **प्रात्यक्षिक परीक्षेकरीता महत्वाच्या सूचना**

१. सदर पदाकरीता सविस्तर जाहिरात क्र.०३/२०१९ मध्ये नमूद केलेप्रमाणे, तसेच विद्यापीठ संकेतस्थळावर वेळोवेळी 'लेखी परीक्षेतील उत्तीर्ण उमेदवारांपैकी भरावयाच्या पदांनुसार १ : ५ या प्रमाणात उमेदवारांना प्रात्यक्षिक परिक्षा/मुलाखतीकरीता बोलविण्यात येईल' अशी सुचना देण्यात आली होती.

२. तथापि, सदर 'माळी' पद तांत्रिक स्वरूपाचे असलेने लेखी परीक्षे सोबतच उमेदवारांची प्रात्यक्षिक परिक्षा आवश्यक आहे. सबब लेखी परीक्षेसाठी उपस्थित सर्वच उमेदवारांची प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येईल. याची लेखी परिक्षेसाठी उपस्थित सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी येताना विद्यापीठामार्फत प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बोलविण्यात आलेले पत्र आणावे. मुळ शासकीय ओळखपत्र (पॅनकार्ड, आधारकार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, मतदान ओळखपत्र इ.) प्रात्यक्षिक परीक्षेवेळी, आणणे आवश्यक आहे.

४. उमेदवारांनी प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळेपुर्वी एक तास अगोदर प्रात्यक्षिक परीक्षेच्या ठिकाणी उपस्थित रहावे.

५. यापुर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे व परीक्षा पध्दतीप्रमाणे एकूण ५० गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा होईल.

६. लेखी परिक्षेसाठी उपस्थित म्हणजेच प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांची नावे विद्यापीठाच्या **www.unishivaji.ac.in** या संकेत स्थळावर recruitment सदरामध्ये तसेच मुख्य इमारतीच्या प्रवेश व्दाराजवळील नोटीस बोर्डवर जाहीर करण्यात येतील.

७. लेखी परीक्षेतील व प्रात्यक्षिक परीक्षेच्या एकत्रीत गुणांमधून निवड होणा—या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिलेनंतर हजर होतेवेळी त्यांच्या कागदपत्रांची छाननी करणेत येईल. सदर छाननीमध्ये कागदपत्रांच्या अभावी/अपु—या/चुकीच्या माहितीमुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव उमेदवार अपात्र झाल्यास संबंधीत उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

८. प्रात्यक्षिक परिक्षेच्या प्रक्रिये दरम्यान नव्याने कोणत्याही प्रकारची कागदपत्रे मुळ अर्जासोबत जोडण्या करता स्वीकारले जाणार नाहीत. तसेच याबाबत कोणताही पत्र व्यवहार करू नये.

९. गुणवत्ता यादीमधील निवड झालेला उमेदवार कोणत्याही कारणास्तव अपात्र झाल्यास गुणवत्ता यादीमधील पुढील उमेदवारांस नियुक्ती आदेश देण्यात येईल.

१०. संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या याद्या प्राथमिक स्वरुपात केवळ प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र उमेदवारांच्या आहेत, याची नोंद घ्यावी.

**११. कोव्हीड १९ विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी जाहीर केलेल्या उपाययोजनांचे काटेकरपणे पालन करण्यात यावे. (मास्कचा वापर करणे, सॅनिटराईजने हात धुणे, सामाजिक अंतर ठेवणे, इत्यादी)**

**लेखी परीक्षेसाठीचा बैठक क्रमांकच उमेदवाराचा प्रात्यक्षिक परीक्षेकरीता बैठक क्रमांक राहील. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी लवकरच जाहीर करण्यात येत आहे, याची संबंधित उमेदवारांनी नोद घ्यावी.**